जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय ,नाशिक (आपत्ती व्यवस्थापन शाखा)
दुरध्वनी क्र. 0253-2315080/2317151 E-Mail- ddmanashik@gmail.com फॅक्स क्र.0253- 2581700

वाचा :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30,33,34, 41 व कलम 51
2. महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्र. कोरोना 2020/प्रक्र.58 आरोग्य 5 दि.13 मार्च 2020
3. महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्र. कोरोना 2020/प्रक्र.58 आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020
4. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचेकडील आदेश क्र. डीएमयु/2020/सीआर,92/DisM-1 दि. 31 मे, 2020
5. या कार्यालयाचे आदेश क्र. कक्ष/कोरोना विषाणू/298/2020 दि. 31/05/2020
6. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचेकडील आदेश क्र. डीएमयु/2020/सीआर,92/DisM-1 दि. 25 जुन, 2020

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**
**क्र.कक्ष/ कोरोना विषाणू/** 344/2020
**नाशिक दिनांक :-** 26/06/2020

## आदेश

ज्या अर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

ज्या अर्थी राज्य शासनाने संदर्भीय 2 अन्वये करोना विषाणूचा ( कोव्हीड 19 ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करून खंड 2,3,व 4 मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय 3 अन्वये प्रसिद्ध केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

ज्या अर्थी कोविड-19 विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असल्याने आपात्कालीन उपाययोजनेचा भाग म्हणून मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात लॉकडाऊन (Lockdown) ची घोषणा यापूर्वी केलेली असून त्यास संदर्भिय 4 अन्वये दिनांक 30/06/2020 पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे. तसेच टप्पेनिहाय लॉकडाऊन समाप्त करणे आणि निर्बंध कमी करणेसाठी **"मिशन बिगीन अगेन" (MISSION BEGIN AGAIN)** बाबत अधिसूचना जाहीर केलेली आहे. उक्त अधिसूचनेची अंमलबजावणी नाशिक जिल्ह्याचे कार्यक्षेत्रात संदर्भिय 5 अन्वये लागू करणेत येत आहे. संदर्भ क्र. 4 मधील उपकलम 7 मध्ये दुरुस्ती करण्यात येत असून "मिशन बिगीन अगेन" (MISSION BEGIN AGAIN) मध्ये खालील प्रमाणे बाबींचा समावेश करण्यात येत आहे.

"मिशन बिगीन अगेन" (MISSION BEGIN AGAIN) चौथ्या टप्प्यामध्ये दिनांक 28 जुन 2020 पासून केशकर्तनालयाचे दुकाने, सलून, स्पा आणि ब्युटी पार्लर खालील अटींवर सुरु करणेस परवानगी देण्यात येत आहे.

- केवळ निवडक सेवा जसे की, केस कापणी, केस रंगवणे, व्हॅक्सींग आणि थ्रेडिंग इत्यादी सेवा देण्यास परवानगी देण्यात येत आहे. मात्र त्वचा ट्रिटमेंट संदर्भातील सेवांना परवानगी नाही याबाबत दुकानामध्ये ठळकपणे बोर्ड प्रदर्शित करावे.
- कर्मचारी यांनी काम करताना ग्लोज, अॅप्रॉन, मास्क व इतर अनुषंगीक संरक्षण साधनांचा वापर करावा.
- प्रत्येक सेवेनंतर खुर्ची सॅनिटाईझ करणे आवश्यक आहे. तसेच दर 2 तासांनी सर्व दुकानाचे क्षेत्र व मजले सॅनिटाईझ केले पाहीजे.

Scanned with CamScanner

- प्रत्येक ग्राहकांसाठी डीस्पोझल टॉवेल्स व नॅपकिन्स वापरणे आवश्यक आहे. तसेच नॉन डिस्पोझल उपकरणे प्रत्येक सेवेनंतर स्वच्छ व निर्जंतुकीकरण केल्या पाहिजेत.
- प्रत्येक दुकानांमध्ये ग्राहकांच्या माहितीसाठी वरील सर्व खबरदारीच्या सूचनांचे बोर्ड ठळकपणे प्रदर्शित करावे.

उक्त संदर्भिय 06 चे अधिसूचनेत नमूद केलेप्रमाणे संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक संस्था यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात येणाऱ्या आस्थापनांचे संदर्भात उक्त आदेशाचा भंग होणार नाही यांची दक्षता घेऊन त्यास व्यापक प्रसिध्दी द्यावी व अंमलबजावणी सनियंत्रण करावे.

शासनाच्या आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती, संस्था अणि संघटना यांनी उल्लंघन केल्यास त्यांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 व भारतीय दंडसंहिता 1860 (45) याच्या कलम 188 शिक्षेसपात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**सोबत:- संदर्भिय अधिसूचना क्र. 06 ची प्रत.**

COLLECTOR OF NASIK

26/6

**(सूरज दि. मांढरे, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**

**प्रति,**

1. मा. आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक यांचेकडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचेकडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
3. आयुक्त, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव यांचेकडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
4. मुख्याधिकारी, न.पा/न.पं (सर्व)---------- मार्फत जिल्हा प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांचेकडेस आवश्यक कार्यवाहीसाठी.
5. उपविभागीय दंडाधिकारी/ तहसिलदार (सर्व) -------- ------------ यांचेकडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
6. जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक यांना आवश्यक त्याकार्यवाहीस्तव व व्यापक प्रसिध्दीकरीता प्रत रवाना.

**प्रत :-**
1. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर
2. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर
3. मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचेकडेस माहितीस्तव आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर.
4. पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण यांचेकडेस माहितीस्तव व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

Scanned with CamScanner